॥ तुज्या माज्या संसाराला ॥

गायकः आशा भोसले, सुरेश वाडकर
गीतः सुधीर मोघे
संगीतः सुधीर फडके
चित्रपटः शापीत

तोः तुज्या माज्या संसाराला आनि काय हवं?
तीः तुज्या माज्या लेकराला घरकुल नवं।
तोः नव्या घरामंदी काय नवीन घडलं?
तीः घरकुलासंग समदं येगळ होईल।
दीस जातील दीस येतील
भोग सरल सुख येईल ॥ धृ. ॥

तीः अवकळा समदी जाईल निगुनी
तरारल बीज तुजं माज्या कुशीतुनी।
तोः मिळल का त्यला ऊन वारा पानी?
राईल का सुकल ते तुज्या-माज्यावानी?
तीः रोप आपलच पर होईल येगळं
दैवासंग झुंजायाचं देवू त्याला बळं ॥ १ ॥

तीः ढगावानी बरसल त्यो वाऱ्यावानी हसवल त्यो
फुलावानी सुखविल काट्याला बी खेळविल
समद्या दुनियेचं मन रिजविल त्यो।
तोः असल त्यो कुनावानी? कसा ग दिसल?
तीः तुज्या माज्या जीवाचा तो आरसा असल ॥ २ ॥

तीः उडुनिया जाईल ही आसवांची रात
आपल्याचसाठी उद्या उटलं पहाट।
तोः पहाटच्या दवावानी तान्ह तुजं माजं
सोसल ग कसं त्याला जीवापाड ओझं?
तीः इवल्याश्या पणतीचा इवलासा जीव
त्योच घेई परी समद्या अंधाराचा ठाव ॥ ३ ॥